महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३० /२०२२ दि. १३ /०४/२०२२

## " वाहतुक नियंत्रण अधिसुचना "

**ज्याअर्थी,** उल्हासनगर शहर तसेच उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्‌दीत दि. १४/०४/२०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात येणार असुन त्यानिमित्त मुख्य दोन मिरवणुका व त्यामध्ये सामील होणाऱ्या १९ उप मिरवणुका या मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणुक मार्गावर वाहतुक कोंडी न होता मिरवणुक सुरळीत पार पाडता यावी व परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चत व्हावी नागरीकाची गैरसोय होवू नये, याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद व नो पार्किंग –** १) गोल मैदान – नेहरू चौक – लिंकरोड – न्यु इरा चौक – शिवाजी चौक – शास्त्री चौक – सागर वाईन्स – काशामल पुतळा – महापालीका चौक – टर्निंग पॉईट – चोपडा कोर्ट – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक – उल्हासनगर या मिरवणुक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक महानगरपालीका कार्यालय येथे जाई पर्यत **दि. १४/०४/२०२२ सकाळी ११.०० ते रात्रौ २४:०० वा पावेतो नो पार्किंग व प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** **अ) साधु वासवाणी पुतळा चौक :–** नेहरू चौक मार्ग शिरू चौक – खेमानी – तसेच फॉलवर लाईन व इतर ठिकाणी जाणारी वाहतुक ही गोल मैदान भगवती नाथानी स्टेज – भारत चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब) नेहरू चौक :–** नेहरू चौक मार्गे शिरू चौक तसेच खेमानी कडे जाणारी वाहतुक ही मच्छी मार्केट व भारत चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**क) शिवाजी चौक :–** शिवाजी चौकात–अंबरनाथ शहराकडुन बाजुकडुन कल्याण बाजुकडे जाणारी वाहतुक ही फॉलवर लाईन येथुन जवाहर हॉटेल – नेहरू चौक – गोल मैदान – मधुबन चौक – गुरूव्दारा चौक – शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ड) शास्त्री चौक :–** शास्त्री चौक येथुन हिराघाटकडे जाणारी वाहतुक ही स्मशानभुमी चौक येथुन काजल पेट्रोल पंप मार्गे इच्छित स्थळी जातील.

**इ) काशामल पुतळा :–** काशामल पुतळा येथुन नेहरू चौककडे जाणारी वाहतुक ही शास्त्री चौक – शिवाजी चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

**फ) गुरूव्दारा चौक :–** गुरूव्दारा चौक येथुन शास्त्री चौककडे जाणारी वाहतुक ही गुरूव्दारा चौक मधुबन चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**भ) सी ब्लॉक नमस्कार चौक :–** शहाड रेल्वे स्टेशन येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, चोपडा कोर्ट चौक, उल्हासनगर महानगरपालिकेचे दिशेने येणारी वाहतूक सी ब्लॉक नमस्कार चौक पावेतो येवून पुढे वळून शांतीनगर जकात नाका साईबाबा मंदिर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**म)** तसेच कल्याण अंबरनाथ रोडने अंबरनाथ दिशेने जाणारी वाहतुक ही होंडा शोरूम येथे डावीकडे वळुन डॉल्फिन क्लब – सुर्यनमस्कार चौक – गुरूव्दारा चौक – मधुबन चौक – नेहरू चौक – जवाहर हॉटेल – फॉलवर लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियत्रंण अधिसुचना ही दि. १४/०४/२०२२ रोजी सकाळी ११:०० वा ते २४:०० वा पावेतो अंमलात राहील. सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर बिग्रेड, रूग्णवाहिका इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( बाळासाहेब पाटील )
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहीतीसाठी,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक, विभाग कल्याण

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, महानगरपालिका, उल्हासनगर

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर/विशेष शाखा

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग कल्याण

प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर

प्रत :–

मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरिकाच्या माहितीसाठी ठाणे पोलीस वेबसाईडवर प्रसिद्ध करण्यास होण्यास विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए.एस.कक्ष ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सहा. पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग/वाहतुक शाखा, उल्हासनगर

पोलीस निरीक्षक, उल्हासनगर/विठ्ठलवाडी/वाहतूक विभाग, ठाणे शहर